पंचायती राज

महाराष्ट्र शासन

## ग्रामविकास व पंचायतराज विभाग

# मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान

## दिशा निर्देश










**सशक्त पंचायत, शाश्वत विकास**


विभागीय आयुक्तालय नाशिक




ग्रामविकास व पंचायतराज विभाग




यशवंतराव चव्हाण पंचायत राज अभियान २०२५





देवेंद्र फडणवीस
मुख्यमंत्री
महाराष्ट्र

मंत्रालय
मुंबई ४०० ०३२

जा.क्र/मु.मं.स/ज.क./२१९/२०२५
दि. २१ ऑगस्ट, २०२५

# शुभेच्छा

भारतातील बहुसंख्य लोकसंख्या ग्रामीण भागात राहते. महात्मा गांधीजींचेही स्पष्ट मत होते की, देशाचा खरा विकास करायचा असेल तर खेडी विकसित झाली पाहिजेत. त्यामुळेच त्यांनी "खेड्याकडे चला" हा संदेश दिला.

राज्यात सक्षम पंचायत राज व्यवस्था उभारण्यात आली आहे. त्रिस्तरीय पंचायत राज व्यवस्थेचा गौरव संपूर्ण देशात होत आहे. महाराष्ट्र नेहमीच आदर्शवत कामगिरी करणारे राज्य म्हणून ओळखले जाते.

मा. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देखील ग्रामीण विकासाला महत्त्व दिले आहे. दीनदयाल उपाध्याय ग्रामीण कौशल्य विकास योजना, प्रधानमंत्री ग्राम सडक योजना, प्रधानमंत्री ग्रामीण आवास योजना, स्वच्छ भारत अभियान यासह असंख्य उपक्रम आणि योजना राबविण्यात येत आहेत. ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांची कार्यक्षमता वाढविणे, प्रोत्साहन देणे आणि ग्रामविकासासाठी कटिबद्धता अधिक बळकट करणे आवश्यक आहे. याच उद्देशाने शासनाने "मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान" राबविण्याचा निर्णय घेतला आहे.

ग्रामपंचायतींना त्यांच्या कार्यक्षमतेनुसार प्रोत्साहीत करणे, स्पर्धात्मक वातावरणात नवी ऊर्जा देणे, यासाठी सन २०२५-२६ या आर्थिक वर्षापासून पुरस्कार देण्याची योजना शासनाने आखली आहे. या पुरस्कारांमुळे पंचायतींना नवे प्रोत्साहन मिळेल, स्थानिक स्तरावर विकासात्मक योजनांची अंमलबजावणी सर्वंकष पद्धतीने होईल. उल्लेखनीय कार्य करणाऱ्या ग्रामपंचायती, पंचायत समिती व जिल्हा परिषद यांचा गौरव करणे हा अभियानाचा प्रमुख हेतू आहे. निकोप स्पर्धेतून राज्यातील इतर पंचायतींनाही विकासाची प्रेरणा मिळेल, अशी मला खात्री आहे.

राज्यातील सर्व ग्रामपंचायती, ग्रामस्थ, तसेच पंचायत राज क्षेत्रात कार्यरत पदाधिकारी, अधिकारी आणि कर्मचारी यांना या अभियानासाठी मी मन:पूर्वक शुभेच्छा देतो. आपण सर्व मिळून ग्रामविकासाची चळवळ अधिक यशस्वी कराल, असा माझा पूर्ण विश्वास आहे.

(देवेंद्र फडणवीस)

दूरध्वनी : ०२२-२२०२ ५१५१/२२०२ ५२२२, ई-मेल : cm@maharashtra.gov.in,
वेब साईट : www.maharashtra.gov.in

# एकनाथ संभाजी शिंदे

उप मुख्यमंत्री
महाराष्ट्र

सत्यमेव जयते

मंत्रालय
मुंबई ४०० ०३२
22 AUG 2025

## शुभेच्छा

महाराष्ट्राच्या विकासाचा खरा केंद्रबिंदू म्हणजे ग्रामीण भाग. गावागावातील प्रगती ही पंचायत राज संस्थांच्या बळकटीकरणावर अवलंबून आहे. या उद्देशाने प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या विचारातून पंचायती राज विभागामार्फत "राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान" राबविले जात आहे. याच प्रेरणेतून महत्त्व लक्षात घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील राज्यात "मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान" सुरू करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे.

हे अभियान केवळ एक शासकीय उपक्रम नाही, तर 'आत्मनिर्भर आणि समृद्ध महाराष्ट्र' घडविण्यासाठीची एक मोठी लोकचळवळ आहे. या अभियानाचा मुख्य हेतू म्हणजे – ग्रामीण भागात सुशासन रुजविणे, पारदर्शकता वाढविणे, स्वच्छतेला चालना देणे, जलव्यवस्थापनात स्वावलंबन निर्माण करणे, आर्थिक प्रगती साधणे आणि सामाजिक न्याय प्रस्थापित करणे. या सर्व प्रयत्नांत एकही घटक वंचित राहू नये आणि प्रत्येक समाजघटकाचा सहभाग घडवून आणला जावा, हीच या अभियानाची खरी ताकद आहे.

संयुक्त राष्ट्रसंघाच्या शाश्वत विकास ध्येय २०३० अंतर्गत असलेल्या "सर्वांना सोबत घेऊन चला" (Leave no one behind) या संकल्पनेला मूर्त रूप देण्याचा हा एक महत्त्वाचा प्रयत्न आहे. या अभियानांतर्गत ग्रामपंचायती, पंचायत समित्या आणि जिल्हा परिषदांना त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीनुसार पुरस्कृत करण्यात येईल. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये सकारात्मक आणि स्पर्धात्मक वातावरण तयार होईल. त्यातून अधिक परिणामकारक, जबाबदार आणि लोकाभिमुख काम करण्याची प्रेरणा मिळेल.

प्रत्येक ग्रामपंचायत, प्रत्येक खेडे आणि प्रत्येक नागरिक या अभियानात सक्रिय सहभाग नोंदवून "आमचं गाव – आमचा विकास" या भावनेतून पुढे सरसावेल, असा मला पूर्ण विश्वास आहे. हे अभियान ग्रामीण महाराष्ट्राचे जीवनमान उंचावेल आणि "विकसित भारत – २०४७" या राष्ट्रीय ध्येयाकडे नेणारा एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरेल, यात मला शंका नाही.

या अभियानात सक्रीय सहभाग घेणाऱ्या सर्व पंचायत संस्था, पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी आणि ग्रामस्थ बांधवांना माझ्या मनःपूर्वक शुभेच्छा !

**(एकनाथ संभाजी शिंदे)**

**कार्यालय :** ६वा मजला, मुख्य इमारत, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, **दूरध्वनी :** ०२२-२२०२ ५०१४ / २२०२ २४०१
**ई-मेल :** dcm@maharashtra.gov.in, **संकेत स्थळ :** www.maharashtra.gov.in

उप मुख्यमंत्री
महाराष्ट्र राज्य

दि. २० ऑगस्ट, २०२५

## शुभेच्छा

ग्रामीण भागाचा सर्वांगीण व शाश्वत विकास हा आपल्या देशाच्या प्रगतीचा कणा आहे. ग्रामीण जनतेच्या आशा-आकांक्षा पूर्ण करण्यासाठी पंचायत राज संस्था हा एक प्रभावी मार्ग असून, देशाच्या विकास प्रवासात या संस्थांची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण ठरते.

राज्यातील ग्रामीण भागाचा चेहरामोहरा बदलण्यासाठी आणि संयुक्त राष्ट्रांच्या शाश्वत विकास ध्येयांची यशस्वी अंमलबजावणी करण्यासाठी "मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान" हे एक प्रभावी व दूरदर्शी माध्यम ठरणार आहे. या अभियानामुळे ग्रामविकासात लोकसहभागाची एक नवी ऊर्जा निर्माण होईल, असा विश्वास आहे.

या अभियानाच्या माध्यमातून प्रत्येक गावाने "आमचं गाव-आमचा विकास" या भावनेतून पुढाकार घेत, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून पारदर्शक आणि लोकाभिमुख शासन राबवावे, ही अपेक्षा आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांना सक्षम केल्याशिवाय शाश्वत विकास साध्य होऊ शकत नाही. या अभियानामुळे ग्रामपंचायतींना लोकसहभागातून गावाचे नियोजन व सर्वांगीण विकास करण्याची संधी उपलब्ध होणार आहे.

या प्रक्रियेत युवक-युवती, महिला, तसेच वंचित व दुर्बल घटकांचा सक्रीय सहभाग आवश्यक आहे. त्यांच्याशिवाय ग्रामविकासाचा पाया भक्कम होऊ शकत नाही. आज गावे समृद्ध, सशक्त आणि आत्मनिर्भर करण्याची संधी आपल्या दाराशी उभी आहे. येत्या काळात महाराष्ट्रातील प्रत्येक गाव शाश्वत विकास ध्येयांची पूर्तता करून आदर्श ठरेल, अशी मला खात्री आहे.

"मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान" ग्रामपंचायतींना नव्या प्रेरणेने कार्य करण्याची ऊर्जा देईल आणि ग्रामविकासाच्या प्रवासाला गती मिळवून देईल.

या अभियानासाठी आणि ग्रामविकासाच्या या सामूहिक प्रवासासाठी मनःपूर्वक शुभेच्छा!

(अजित पवार)

मंत्री
ग्रामविकास व पंचायत राज
महाराष्ट्र राज्य
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
*www.maharashtra.gov.in*

दिनांक : 21 AUG 2025

## शुभेच्छा संदेश

मला आज अत्यंत आनंद होत आहे की, ग्रामविकास विभाग "मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान" या महत्त्वाकांक्षी अभियानाची माहिती पुस्तिका आपल्या सर्वांपर्यंत पोहोचवत आहे. या अभियानाच्या माध्यमातून आपण सर्वजण मिळून एका समृद्ध आणि विकसित महाराष्ट्राचे स्वप्न साकार करण्याच्या दिशेने एक मोठे पाऊल उचलत आहोत. महाराष्ट्राचे माननीय मुख्यमंत्री ना.श्री.देवेंद्रजी फडणवीस साहेब यांच्या दूरदृष्टी आणि संकल्पनेतून **"मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान"** हे महत्त्वाकांक्षी अभियान संपूर्ण राज्यात राबविण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. ग्रामीण महाराष्ट्राचा विकास हाच राज्याच्या सर्वांगीण विकासाचा पाया आहे, यावर मा.मुख्यमंत्री महोदयांचा दृढ विश्वास आहे, ही बाब ग्राम विकास विभागाच्या दृष्टीने अत्यंत अभिमानास्पद आहे.

"सर्वांना सोबत घेऊन चला" (Leave no one behind) या संयुक्त राष्ट्रांच्या शाश्वत विकासाच्या ध्येयावर आधारित हे अभियान, आपल्या राज्यातील पंचायत राज संस्थांना अधिक सक्षम, गतिमान आणि लोकाभिमुख बनवण्यासाठी एक सुवर्णसंधी आहे. या अभियानाचा मुख्य उद्देश केवळ गावांना पुरस्कार देणे नसून, गावा-गावांमध्ये विकासाची एक निकोप स्पर्धा निर्माण करणे, सुशासन प्रस्थापित करणे आणि प्रत्येक गावाला आत्मनिर्भर बनवणे हा आहे.

या अभियानाचे सुशासन, आर्थिक स्वावलंबन, जल समृद्धी, योजनांचे अभिसरण, संस्थांचे सक्षमीकरण, उपजीविका विकास आणि लोकसहभाग असे ७ मुख्य घटक असून हे आपल्या गावांच्या सर्वांगीण विकासाचा पाया आहेत. यातून, प्रत्येक घरात नळाद्वारे शुद्ध पाणी, '**आयुष्मान भारत**' या सारख्या योजनांचा लाभ, डिजिटल शाळा, रोजगाराच्या संधी आणि महिलांचे सक्षमीकरण यांसारखे अनेक फायदे थेट नागरिकांपर्यंत पोहोचतील. त्यामधून, गावाच्या सर्वांगीण विकासास चालना मिळेल, यात मुळीच शंका नाही.

अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी पंचायतराज संस्थांतील पदाधिकारी, अधिकारी व कर्मचारी यांना सुयोग्य प्रशिक्षण दिले जाईल. त्यामुळे ग्रामपंचायतीमध्ये कार्यक्षमते सोबतच विकासासाठीचे नवे आदर्श उभे राहतील. उत्कृष्ट आणि अत्युत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या ग्रामपंचायतीकडून प्रेरणा घेऊन इतर ग्रामपंचायतीही आपली विकासाची दिशा व गती सुधारतील, यात मुळीच शंका नाही.

या अभियानातून राज्यात ग्रामविकासाची एक लोकचळवळ उभी राहील. या चळवळीत फक्त स्पर्धा किंवा बक्षीसप्राप्ती एवढाच हेतू न ठेवता, सामायिक विकासाचे ध्येय डोळ्यासमोर ठेवून गावकरी एकदिलाने प्रयत्न करतील. शासनाच्या विविध योजनांचे एकत्रीकरण साध्य होऊन विकासाची नवी बांधिलकी प्रत्येक ग्रामपंचायतीत निर्माण होईल, अशी पक्की धारणा आहे.

या अभियानाच्या यशस्वीतेसाठी मी, राज्यातील सर्व ग्रामपंचायतींचे पदाधिकारी, अधिकारी आणि कर्मचारी यांना या अभियानातील सहभागासाठी आणि अतिउत्कृष्ट कामगिरीसाठी मन:पूर्वक शुभेच्छा देतो. या अभियान युक्त स्पर्धेमध्ये आपण उत्तम यश मिळवावे, अशी सदिच्छा व्यक्त करतो.

(जयकुमार गोरे)

राज्य मंत्री
महाराष्ट्र राज्य

**योगेश ज्योती रामदास कदम**

**राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य**

गृह (शहरे), महसूल, ग्रामविकास व पंचायती राज,
अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण, अन्न व औषधी प्रशासन

दिनांक :

## शुभेच्छा संदेश

महाराष्ट्राच्या ग्रामविकास विभागाच्या वतीने सुरू करण्यात आलेले "मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान" हे राज्यातील ग्रामीण विकासाच्या प्रवासातील एक मैलाचा दगड आहे. या अभियानातून पंचायतराज संस्थांना त्यांच्या कार्याची गुणवत्ता आणि कार्यक्षमतेनुसार प्रोत्साहन मिळेल. एक गाव, एक ओळख या तत्वावर आधारित हे अभियान गावांना स्वतःची ओळख निर्माण करण्यासाठी आणि विकासाच्या वाटेवर अग्रेसर राहण्यासाठी प्रेरणा देईल.

हे अभियान सात मुख्य घटकांवर लक्ष केंद्रित करते, ज्यात सुशासन, आर्थिक स्वावलंबन, स्वच्छता, जलव्यवस्थापन, उपजीविका विकास, आरोग्य आणि सामाजिक न्याय यांचा समावेश आहे.

या सर्व घटकांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या ग्रामपंचायती, पंचायत समित्या आणि जिल्हा परिषदांना तालुका, जिल्हा, विभाग आणि राज्य स्तरावर आकर्षक बक्षिसे देऊन सन्मानित केले जाईल. हे केवळ पुरस्कार नाहीत, तर ग्रामीण महाराष्ट्राच्या विकासाची दिशा निश्चित करणारी एक प्रेरणा आहे.

मला विश्वास आहे की, हे अभियान केवळ प्रशासकीय सुधारणाच घडवून आणणार नाही, तर ग्रामीण समुदायामध्ये एकतेची भावना निर्माण करेल. प्रत्येक नागरिकाने आपल्या गावाच्या विकासासाठी वैयक्तिक योगदान देणे आवश्यक आहे. शासनाच्या योजनांची माहिती घेऊन, लोकसहभागातून कामे केल्यास खऱ्या अर्थाने समृद्ध पंचायतराज साकार होईल. या अभियानाच्या यशस्वितेसाठी आणि ग्रामीण महाराष्ट्राच्या उज्ज्वल भविष्यासाठी मी हार्दिक शुभेच्छा देतो.

(योगेश ज्योती रामदास कदम)

मंत्रालय, दालन क्रमांक ६२६-६२८, सहावा मजला, (मुख्य इमारत व जुनी इमारत जोडणारा पूल), मुंबई - ४०००३२, महाराष्ट्र राज्य.

ईमेल: yogesh-kadam@mah.gov.in | दूरध्वनी: ०२२-२२०२१०३६/३७ (१०, सुनिती निवासस्थान)

प्रधान सचिव
ग्रामविकास व पंचायत राज
महाराष्ट्र राज्य
बांधकाम भवन, मुंबई ४००००१
दि. २१ ऑगस्ट, २०२५

## शुभेच्छा संदेश

महाराष्ट्र शासनाचा ग्रामविकास व पंचायत राज विभाग नेहमीच ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्नशील असतो. याच प्रयत्नांचा एक भाग म्हणून "मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान" सुरू करण्यात येत आहे. संयुक्त राष्ट्रसंघाने जाहीर केलेल्या 'शाश्वत विकास ध्येये २०३०' च्या अनुषंगाने, ग्रामीण भागातील विकासाच्या गरजा ओळखून हे अभियान तयार करण्यात आले आहे.

शाश्वत विकास ध्येयांवर आधारित विकास संकल्पनावर आधारित हे अभियान, ग्रामीण जीवनाच्या सर्व महत्वाच्या पैलूंना स्पर्श करणारे आहे. या अभियानाच्या माध्यमातून कोणत्याही गावाचा विकास मागे राहणार नाही. उत्तम प्रशासनापासून सामाजिक न्यायापर्यंत, प्रत्येक क्षेत्रातील उत्कृष्ट कामगिरीला हे अभियान प्रोत्साहन देईल.

या अभियानामुळे ग्रामपंचायती, पंचायत समित्या आणि जिल्हा परिषदा यांच्यात एक सकारात्मक स्पर्धा निर्माण होईल, ज्यामुळे पंचायत राज संस्थांमध्ये लोकांना देण्यात येणा-या सेवा हमीची व कामाची गुणवत्ता सुधारेल आणि शासनाच्या योजनांची अंमलबजावणी अधिक प्रभावीपणे होईल.

हे अभियान केवळ पुरस्कारांपुरते मर्यादित नसून, एक सशक्त आणि आत्मनिर्भर ग्रामीण व्यवस्था निर्माण करण्याचे उद्दिष्ट ठेवणारे आहे. आम्ही हे अभियान यशस्वी करण्यासाठी सर्व प्रशासकीय स्तरावर पूर्णपणे कटिबद्ध आहोत. मला खात्री आहे की, सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांचे अधिकारी आणि कर्मचारी, तसेच ग्रामीण भागातील जनता, हे अभियान यशस्वी करण्यासाठी आपले संपूर्ण योगदान देतील. हे अभियान ग्रामीण महाराष्ट्राचा चेहरा बदलेल आणि विकासाच्या नव्या युगाची सुरुवात करेल अशी माझी दृढ खात्री आहे. या अभियानाच्या यशस्वीतेसाठी आणि ग्रामीण महाराष्ट्राच्या उज्ज्वल भविष्यासाठी मी सर्वांना शुभेच्छा देतो.

**एकनाथ डवले** (भा.प्र.से.)

## मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान

संयुक्त राष्ट्र संघाने "शाश्वत विकासासाठी जागतिक परिवर्तन कार्यक्रम २०३०" जाहीर केला असून "सर्वांना सोबत घेऊन चला" (Leave no one behind) हा या जागतिक कार्यक्रमाचा गाभा आहे. सयुंक्त राष्ट्र संघाने १७ शाश्वत विकास ध्येये व त्या अंतर्गत १६९ लक्ष्ये/ उद्दिष्टे जाहीर केली असून, त्यांची अंमलबजावणी दि. ०१ जानेवारी २०१६ पासून भारतात सुरु करण्यात आली आहे. भारत सरकारच्या पंचायत राज विभागाने शाश्वत विकासाच्या ध्येयांच्या स्थानिकीकरणासाठी शाश्वत विकासाच्या ध्येयांचे नऊ संकल्पनेमध्ये रुपांतर केले असून, त्या अनुषंगाने ग्रामीण विकासासाठी शासनाचे विविध विभाग मार्गक्रमण करीत आहेत.

ग्रामीण महाराष्ट्राच्या विकासामध्ये पंचायत राज संस्थांचे मोठे योगदान असुन त्रिस्तरीय पंचायत राज संस्थेमार्फत ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास करणे हे मुख्य ध्येय आहे. राज्यातील विकासाच्या बहुतांश योजना पंचायत राज संस्थांमार्फत राबविल्या जातात. त्याअनुषंगाने ग्रामीण भागात स्थानिक स्वराज्य संस्था म्हणून काम करणाऱ्या ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषदांना कामगिरीनुसार प्रोत्साहित करुन त्यांची कार्यक्षमता वाढविणे आवश्यक आहे. ग्राम विकास विभाग व शासनाच्या इतर विभागांच्या विविध योजना जिल्हा परिषदेमार्फत राबविल्या जातात. सदर योजनांची प्रभावी व जलदगतीने अंमलबजावणी करून, त्यांचा लाभ ग्रामीण भागातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविणे, यातून ग्रामीण भागातील लोकांचे जीवनमान उंचावणे, ग्रामपंचायती मध्ये लोकसहभागाची चळवळ निर्माण करणे, ग्रामीण नागरिकांना सुलभ रीतीने सेवा देणे, महाराष्ट्रातील थोर संत परंपरेचा सहभाग घेणे, आरोग्य , शिक्षण, उपजीविका, सामाजिक न्याय या मुख्य क्षेत्रामध्ये ग्रामपंचायतीचा सहभाग वाढवून पंचायत राज संस्था गतिमान करणे या संकल्पनेतून "मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान राज्य शासनाने जाहीर केले आहे.

### अभियानाचे मुख्य घटक तथा विषय:

१ सुशासन युक्त पंचायत (लोकाभिमुख सक्षम पंचायत प्रशासन (Governance )तयार करणे)

२ सक्षम पंचायत (स्वनिधी, CSR व लोकवर्गणीतून पंचायत राज संस्थांना आर्थिक दृष्ट्या सक्षम करणे)

३ जल समृद्ध, स्वच्छ व हरित गाव निर्माण करणे

४ मनरेगा व इतर योजनांचे अभिसरण करणे

५ गावपातळीवरील संस्था सक्षमीकरण करणे

६ उपजिविका विकास व सामाजिक न्याय

७ लोकसहभाग व श्रमदान माध्यमातून लोकचळवळ निर्माण करणे

### अभियानाचा कालावधी :-

अभियानाचा कालावधी दिनांक १७ सप्टेंबर ते ३१ डिसेंबर असा राहिल.

### अभियानाची पूर्व तयारी :

- दिनांक १ ऑगस्टपासून अभियानाची पूर्व तयारी करणे (राज्य,विभाग,जिल्हा व तालुका स्तरावर बैठका)
- तालुका व जिल्हा स्तरावर प्रशिक्षण ,ग्रामपंचायतीना प्रशिक्षण
- ग्रामस्तरावर अभियानाची पूर्वतयारी ,तालुका स्तरीय अधिकाऱ्यांना ग्रामपंचायतीकडे संपर्क अधिकारी म्हणून नेमणे.

- दि. १७ सप्टेंबर रोजी ग्रामसभा व ग्रामस्तरीय समितीची स्थापना तसेच विषयवार लहान गट स्थापन करणे.
- अभियान कालावधीत सर्व मुद्दयांवर कार्यवाही करणे व दैनंदिन अहवाल App वर पाठवणे.
- ऑक्टोबर व नोव्हेंबर महिन्यात संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करणे .

## राज्यस्तरीय संनियंत्रण समिती

| अ.क्र. | नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | मा.मंत्री, ग्रामविकास व पंचायत राज विभाग | अध्यक्ष |
| २ | मा.राज्यमंत्री, ग्रामविकास व पंचायत राज विभाग | उपाध्यक्ष |
| ३ | अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/सचिव, पाणीपुरवठा विभाग | सदस्य |
| ४ | अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/सचिव, कृषि विभाग | सदस्य |
| ५ | अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/सचिव, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग | सदस्य |
| ६ | अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/सचिव, महिला व बाल विकास विभाग | सदस्य |
| ७ | अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/सचिव, शालेय शिक्षण विभाग | सदस्य |
| ८ | अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/सचिव, मृद व जलसंधारण विभाग | सदस्य |
| ९ | अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/सचिव, कौशल्य विकास, रोजगार, उद्योग व संशोधन | सदस्य |
| १० | अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/सचिव, सामाजिक न्याय विभाग | सदस्य |
| ११ | अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/सचिव, रोजगार हमी फलोत्पादन विभाग | सदस्य |
| १२ | अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/सचिव, आरोग्य विभाग | सदस्य |
| १३ | अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/सचिव, महसूल विभाग | सदस्य |
| १४ | अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/सचिव, ग्रामविकास व पंचायत राज विभाग | सदस्य सचिव |
| १५ | मा.अध्यक्ष आदर्श गाव संकल्पना समिती महाराष्ट्र राज्य | सदस्य |
| १६ | दोन निमंत्रित सदस्य (अध्यक्ष यांनी निवड केलेल्या ग्रामीण विकासात प्रभावशाली काम करणाऱ्या व्यक्ती ) | सदस्य |

- या अभियानामध्ये ग्रामपंचायतीची महत्वपूर्ण भूमिका असल्याने, ग्रामपंचायत स्तरावर प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी सरपंच /प्रशासक यांचे अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात येईल. सदर समिती मध्ये ग्रामपंचायतीचे सर्व पदाधिकारी व गाव पातळीवरील सर्व अधिकारी /कर्मचारी सदस्य म्हणून कार्यरत राहतील .समितीचे सदस्य सचिव म्हणून "ग्रामपंचायत अधिकारी" हे काम पाहतील. उद्दिष्टांची प्रभावी अंमलबजावणी करून जास्तीत जास्त गुणांकन मिळविणे, हे या समितीचे महत्वाचे कार्य असणार आहे.

- अभियान अंतर्गत निर्देशकांची काटेकोरपणे अंमलबजावणी साठी विभाग, जिल्हा व पंचायत समिती स्तरावर सनियंत्रण व मुल्यमापन यंत्रणा समिती नियोजन करेल .
  अ) विभागीय आयुक्त हे विभागातील प्रत्येक जिल्ह्यासाठी, अपर आयुक्त/ उपायुक्त/ उपसंचालक/ सहआयुक्त या दर्जाच्या अधिकाऱ्यांची पालक अधिकारी म्हणून नेमणूक करतील.

ब) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद हे जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यासाठी जिल्हा परिषद, विभाग प्रमुख यांची पालक अधिकारी म्हणून नेमणूक करतील.

क) गटविकास अधिकारी, पंचायत समिती हे त्यांच्या तालुक्यातील जिल्हा परिषद मतदारसंघा साठी, पंचायत समिती मधील विभाग प्रमुख यांची संपर्क अधिकारी म्हणून नेमणूक करतील.

## ग्रामपंचायत निवडीची कार्यपद्धती :

- "मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान" अंतर्गत तालुका, जिल्हा, विभाग व राज्य स्तरावर तपासणी करून ग्रामपंचायतीची पुरस्काराकरिता निवड करण्यासाठी तालुका, जिल्हा, विभाग व राज्य स्तरावरील निवड/मुल्यमापन समिती मार्फत करण्यात येणार आहे.
- ग्रामपंचायतींकडून प्राप्त स्वमुल्यांकन प्रस्तावांचे तालुका स्तरावरील समितीकडून मुल्यमापन करून, तालुकास्तरावरील सर्वाधिक गुण प्राप्त ३ ग्रामपंचायतींची तालुकास्तरीय अत्युत्कृष्ट ग्रामपंचायत म्हणून निवड करण्यात येईल. तसेच २ ग्रामपंचायतींची विशेष पुरस्कारासाठी निवड केली जाईल.
- जिल्ह्यातील तालुकास्तरावरील अत्युत्कृष्ट ३ ग्रामपंचायतींचे जिल्हास्तरीय समितीमार्फत मुल्यमापन करून, सर्वाधिक गुण प्राप्त ३ ग्रामपंचायतींची जिल्हास्तरीय अत्युत्कृष्ट ग्रामपंचायत म्हणून निवड करण्यात येईल.
- राज्यातील ६ महसुली विभागातील जिल्हास्तरावरील अत्युत्कृष्ट प्रत्येकी प्रथम २ ग्रामपंचायतींचे विभागस्तरीय समितीमार्फत मुल्यमापन करून, सर्वाधिक गुण प्राप्त ३ ग्रामपंचायतींची विभागस्तरीय अत्युत्कृष्ट ग्रामपंचायत म्हणून निवड करण्यात येईल.
- या विभागस्तरावरील अत्युत्कृष्ट प्रथम २ ग्रामपंचायतींचे राज्यस्तरीय समितीमार्फत मुल्यमापन करून, सर्वाधिक गुण प्राप्त ३ ग्रामपंचायतींची राज्यस्तरीय अत्युत्कृष्ट ग्रामपंचायत म्हणून निवड करण्यात येईल.

## मूल्यमापन :

या सर्व स्तरांवरचा मुल्यमापन कालावधी व प्रस्ताव सादर करण्याची प्रत्येक आर्थिक वर्षातील अंतिम तारीख खालीलप्रमाणे आहे:-

तालुकास्तरीय मूल्यमापन :- दि.११ जानेवारी ते दि.२६ जानेवारी

जिल्हा स्तरीय मूल्यमापन :- दि.२८ जानेवारी ते दि.१५ फेब्रुवारी

विभाग स्तरीय मूल्यमापन :- दि.१७ फेब्रुवारी ते दि.२७ फेब्रुवारी

राज्यस्तरीय मूल्यमापन :- संपूर्ण मार्च महिना

| अ.क्र. | मूल्यमापन करणारी समिती | मूल्यमापन/निवड प्रस्ताव सादर करण्याची अंतिम तारीख |
|---|---|---|
| १ | ग्रामपंचायत स्तरावरून तालुका स्तरीय समिती कडे अर्ज स्वमुल्यांकन करून सादर करणे | दि.१० जानेवारी |
| २ | जिल्हास्तरीय समिती | दि २७ जानेवारी |
| ३ | विभाग स्तरीय समिती | दि.१६ फेब्रुवारी |
| ४ | राज्यस्तरीय समिती | दि.२८ फेब्रुवारी |

## मूल्यमापन समित्या :

१) तालुकास्तरावर प्रथम, द्वितीय, तृतीय व 2 विशेष पुरस्कारासाठी ग्रामपंचायतींची निवड करण्याकरिता मूल्यमापनासाठी खालीलप्रमाणे तालुकास्तरीय समिती असेल.

**तालुकास्तरीय मुल्यमापन समिती**

| अ.क्र. | नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | गट विकास अधिकारी, पंचायत समिती | अध्यक्ष |
| २ | महिला व बाल विकास प्रकल्प अधिकारी, पंचायत समिती | सदस्य |
| ३ | गट शिक्षण अधिकारी, पंचायत समिती | सदस्य |
| ४ | तालुका आरोग्य अधिकारी, पंचायत समिती | सदस्य |
| ५ | कृषी अधिकारी, पंचायत समिती | सदस्य |
| ६ | उप अभियंता (बांधकाम),पंचायत समिती | सदस्य |
| ७ | उप अभियंता (पाणी पुरवठा),पंचायत समिती | सदस्य |
| ८ | उप अभियंता (लघु पाटबंधारे ), पंचायत समिती | सदस्य |
| ९ | तालुकास्तर पत्रकार संघाच्या वतीने निवडलेले एक प्रतिनिधी | सदस्य |
| १० | विस्तार अधिकारी (पंचायत ), पंचायत समिती | नोडल अधिकारी |
| ११ | सहायक गट विकास अधिकारी, पंचायत समिती | सदस्य सचिव |

२) जिल्हास्तरावर प्रथम, द्वितीय व तृतीय पुरस्कारासाठी ग्रामपंचायतींची निवड करण्याकरिता मूल्यमापनासाठी खालीलप्रमाणे जिल्हास्तरीय समिती असेल.

**जिल्हास्तरीय मुल्यमापन समिती**

| अ.क्र. | नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद | अध्यक्ष |
| २ | अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद | सहअध्यक्ष |
| ३ | प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा ,जिल्हा परिषद | सदस्य |
| ४ | उप मुख्य कार्यकारी अधिकारी(सा.प्र.वि.), जिल्हा परिषद | सदस्य |
| ५ | उप मुख्य कार्यकारी अधिकारी(म.बा.क.),जिल्हा परिषद | सदस्य |
| ६ | जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद | सदस्य |
| ७ | शिक्षण अधिकारी (प्राथमिक),जिल्हा परिषद | सदस्य |
| ८ | जिल्हा कृषि अधिकारी, जिल्हा परिषद | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ९ | कार्यकारी अभियंता बांधकाम, जिल्हा परिषद | सदस्य |
| १० | कार्यकारी अभियंता (ग्रा.पा.पु.), जिल्हा परिषद | सदस्य |
| ११ | जिल्हा पत्रकार संघाच्या वतीने निवडलेले १ प्रतिनिधी | सदस्य |
| १२ | उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत), जिल्हा परिषद | सदस्य सचिव |

३) विभागस्तरावर प्रथम, द्वितीय व तृतीय पुरस्कारासाठी ग्रामपंचायतींची निवड करण्याकरिता मूल्यमापनासाठी खालीलप्रमाणे विभागस्तरीय समिती असेल.

**विभागस्तरीय मुल्यमापन समिती**

| अ.क्र. | नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय | अध्यक्ष |
| २ | अपर आयुक्त (आस्था), विभागीय आयुक्त कार्यालय | सहअध्यक्ष |
| ३ | उपसंचालक (आरोग्य), विभागीय आयुक्त कार्यालय | सदस्य |
| ४ | उपसंचालक (शिक्षण), विभागीय आयुक्त कार्यालय | सदस्य |
| ५ | उप आयुक्त (महिला व बालकल्याण), विभागीय आयुक्त कार्यालय | सदस्य |
| ६ | प्राचार्य, प्रशिक्षण केंद्र (अध्यक्षांनी निवडलेले) | सदस्य |
| ७ | उप संचालक ( सामाजिक न्याय) | सदस्य |
| ८ | अपर आयुक्त (विकास ), विभागीय आयुक्त कार्यालय | सदस्य सचिव |

४) राज्यस्तरावर प्रथम, द्वितीय व तृतीय पुरस्कारासाठी ग्रामपंचायतींची निवड करण्याकरिता मूल्यमापनासाठी खालीलप्रमाणे राज्यस्तरीय समिती असेल.

**राज्यस्तरीय मुल्यमापन समिती**

| अ.क्र. | नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | प्रधान सचिव ग्रामविकास व पंचायत राज, महाराष्ट्र शासन | अध्यक्ष |
| २ | उप सचिव, पाणीपुरवठा विभाग, महाराष्ट्र शासन | सदस्य |
| ३ | उप सचिव, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन | सदस्य |
| ४ | उप सचिव, रोजगार हमी फलोत्पादन विभाग, महाराष्ट्र शासन | सदस्य |
| ५ | उप सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र शासन | सदस्य |
| ६ | संचालक, राज्य ग्रामीण विकास संस्था, यशदा, पुणे | नोडल अधिकारी |
| ७ | मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ८ | संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष ग्रामीण गृहनिर्माण योजना महाराष्ट्र राज्य | सदस्य |
| ९ | संचालक, पंचायत राज, महाराष्ट्र राज्य | सदस्य |
| १० | मंत्रालय पत्रकार संघाच्या वतीने नामनिर्देशित केलेले एक पत्रकार | सदस्य |
| ११ | सह/उप सचिव (राज्य योजना), ग्राम विकास विभाग | सदस्य सचिव |

(१) ज्या ग्रामपंचायतींची वरिष्ठ स्तरावरील पुरस्कारासाठी निवड झाली असेल, त्या ग्रामपंचायतीला वगळून, पुरस्कारासाठीच्या एकूण गुणांकनामध्ये, त्या नंतरचे गुणांकन असणाऱ्या ग्रामपंचायती निवडीस पात्र राहतील. ही पद्धत राज्य, महसूली विभाग, जिल्हा व तालुका या प्रत्येक स्तरावर अवलंबिली जाईल.

सदर अभियानांतर्गत जिल्हा परिषद व पंचायत समिती यांनी ही उत्स्फूर्त व सक्रीयपणे सहभाग घ्यावा. याकरिता महसुली विभागस्तरावर ग्रामपंचायतींना प्राप्त गुणांकनाच्या आधारे काढलेल्या टक्केवारीनुसार सर्वाधिक गुण प्राप्त ३ पंचायत समितींची विभागस्तरीय अत्युत्कृष्ट पंचायत समिती म्हणून निवड करण्यात येईल.

(२) या विभागस्तरावरील अत्यत्कृष्ट प्रथम २ पंचायत समितींचे राज्यस्तरीय समितीमार्फत मुल्यमापन करून, सर्वाधिक गुण प्राप्त ३ पंचायत समितींची राज्यस्तरीय अत्युत्कृष्ट पंचायत समिती म्हणून निवड करण्यात येईल.

पंचायत समितीची वरिष्ठ स्तरावरील पुरस्कारासाठी निवड झाली असेल, त्या पंचायत समितीला वगळून यापूर्वीच्या पुरस्कारासाठी गुणांकनामध्ये त्या नंतरचे गुणांकन असणारी पंचायत समिती निवडीस पात्र राहील.

(३) राज्यस्तरावर ग्रामपंचायतींना प्राप्त गुणांकनाच्या आधारे काढलेल्या टक्केवारीनुसार सर्वाधिक गुण प्राप्त ३ जिल्हा परिषदांची राज्यस्तरीय अत्युत्कृष्ट जिल्हा परिषद म्हणून निवड करण्यात येईल.

उपरोक्त प्रमाणे पुरस्कार प्राप्त ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषदांना शासनाच्या वतीने पुरस्कार व प्रमाणपत्र देवून गौरविण्यात येईल. विभागीय व राज्यस्तरीय पुरस्कार मे महिन्यात मा.राज्यपाल व मा. मुख्यमंत्री यांच्या हस्ते मा. उपमुख्यमंत्री, मा. मंत्री (ग्रामविकास), मा. राज्यमंत्री (ग्रामविकास) यांच्या उपस्थितीत प्रदान केले जातील.

## क्षमता बांधणी व प्रशिक्षण

१. जिल्हा स्तर नोडल अधिकारी, इतर अधिकारी/भागधारकांना हँडहोल्डिंग, क्षमता वृद्धी आणि प्रशिक्षण पूर्ण करण्यात येईल.
२. राज्य स्तर प्रविण प्रशिक्षक आणि विविध विभागातील अधिकारी, कर्मचारी यांचे प्रशिक्षण आयोजित करण्यात येईल.
३. यशदा मार्फत स्थानिक भाषेत प्रशिक्षण मॉड्युल विकसित करण्यात येईल.
४. क्षमता बांधणी प्रशिक्षण राज्य ग्रामीण विकास संस्था, यशदा यांच्यामार्फत राबविण्यात येईल.

- मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाबाबत जनजागृती/अभियानामध्ये लोकसहभाग वाढवण्याकरिता जास्तीत जास्त लोकांना प्रोत्साहित करणे/या कार्यक्रमाची जनतेस माहिती करून देणे/अंमलबजावणीचे समीक्षण करणे इत्यादी बाबत उत्कृष्ट कार्य करणाऱ्या विभागातील एका ग्रामीण पत्रकारास राज्यस्तरावर पुरस्कार देवून गौरविण्यात येईल.

अभियानास इन्स्टाग्राम, फेसबुक, युट्युब या ॲप्स वर व्यापक प्रसिद्धी देणाऱ्या ३ चॅनल/अकाउंट (बातम्या देणारे चॅनल्स वगळता) यांना राज्यस्तरावर पुरस्कार देवून गौरविण्यात येईल. अभियानाच्या कालावधीत यासंदर्भातील प्रसिद्धीकरिता इन्स्टाग्राम, फेसबुक, युट्युब यांचे एकत्रित यापैकी कोणत्याही एका माध्यमावर/ एकत्रित दोन माध्यमांवर/एकत्रित तिन्ही माध्यमांचे कमीतकमी एकूण १० लाख views असणारे चॅनल पात्र असतील. पुरस्कार मिळविण्यासाठी, पुरस्कारासाठी एकूण मिळालेले views चे अहवाल जे शासनास सादर करतील तेच पुरस्कारासाठी ग्राह्य धरले जातील.

- सदर अभियान यशस्वीरित्या राबविण्यासाठी महसूल विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग, दिव्यांग कल्याण विभाग, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, नियोजन (रोजगार हमी) विभाग, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महिला व बाल विकास विभाग, मृद व जलसंधारण विभाग, कृषी, पशुसंवर्धन दुग्ध व मत्स्य व्यवसाय विभाग, शालेय शिक्षण विभाग, सामाजिक न्याय विभाग, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग व इतर विभागांनी, त्या विभागाच्या अधिनस्त असणाऱ्या संबंधित क्षेत्रीय अधिकाऱ्यांना आवश्यक त्या ठिकाणी तत्परतेने सहकार्य करण्याचे निर्देश शासनाने दिलेले आहेत.

## पुरस्काराचे स्वरुप :

| पंचायतराज संस्था | तालुका स्तर | जिल्हा स्तर | विभागस्तर | राज्यस्तर | एकूण पुरस्काराची संख्या |
|---|---|---|---|---|---|
| ग्रामपंचायत | ३५१ x ३ ग्रा.पं. = १०५३ ग्रा.पं. | ३४ X ३ ग्रा.पं. = १०२ ग्रा.पं. | ६ X ३ ग्रा.पं. = १८ ग्रा.पं. | ३ ग्रा.पं. | १८७८ |
| | विशेष पुरस्कार प्रत्येक तालुक्यातील २ ग्रामपंचायती ३५१ x २ पुरस्कार = ७०२ ग्रा.पं. | - | - | - | - |
| पंचायत समिती | - | - | ६ X ३ पंचायत समिती = १८ पंचायत समिती | ३ पंचायत समिती | २१ |
| जिल्हा परिषद | - | - | - | ३ जिल्हा परिषद | ३ |
| | | | | | १९०२ |

## पुरस्काराची रक्कम-

| संस्था स्तर | क्रमांक | तालुका स्तर पुरस्कार रक्कम | जिल्हा स्तर पुरस्कार रक्कम | विभागस्तर पुरस्कार रक्कम | राज्यस्तर पुरस्कार रक्कम | पुरस्काराची एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| ग्रामपंचायत | प्रथम | १५ लक्ष x ३५१ ग्रा.पं. | ५० लक्ष X ३४ ग्रा.पं. | १ कोटी X ६ ग्रा.पं. | ५ कोटी | |
| | द्वितीय | १२ लक्ष x ३५१ ग्रा.पं. | ३० लक्ष X ३४ ग्रा.पं. | ८० लक्ष X ६ ग्रा.पं. | ३ कोटी | |
| | तृतीय | ०८ लक्ष x ३५१ ग्रा.पं. | २० लक्ष X ३४ ग्रा.पं. | ६० लक्ष X ६ ग्रा.पं. | २ कोटी | |
| | विशेष पुरस्कार | ०५ लक्ष (प्रति तालुका २ विशेष पुरस्कार x ७०२ ग्रा.पं. | --- | --- | — | |
| पंचायत | प्रथम | --- | --- | १ कोटी x ६ | २ कोटी | |
| समिती | द्वितीय | --- | --- | ७५ लक्ष x ६ | १.५ कोटी | |
| | तृतीय | --- | --- | ६० लक्ष x ६ | १.२५ कोटी | |
| जिल्हा | प्रथम | — | --- | — | ५ कोटी | |
| परिषद | द्वितीय | --- | --- | --- | ३ कोटी | |
| | तृतीय | --- | --- | --- | २ कोटी | |

## लोकसहभागाची प्रक्रिया:

अभियान कालावधीत जास्तीत जास्त लोकांना सहभागी करून घेणे तसेच ग्रामपंचायतींना सहभागी करून घेण्यासाठी जिल्हा व तालुका स्तरावर व्यापक प्रसिद्धी देणे आवश्यक आहे. याशिवाय क्षमता बांधणी, प्रशासकीय खर्च, प्रचार प्रसिद्धी, कार्यशाळा, प्रशिक्षण, मेळावे, यशोगाथा, फिल्म, तांत्रिक सल्लागार इ. बाबींसाठी शासन स्तरावरून आवश्यक तरतूद करण्यात आली आहे.

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान हे लोकचळवळीच्या स्वरुपात राबवावयाचे असून, त्यासाठी लोकसहभाग अत्यंत आवश्यक व महत्वाचा आहे. यासाठी खालील प्रमुख बाबी, उपक्रम व कृती कार्यक्रम हाती घ्यावा.

## अ) लोकसहभागाच्या बाबी

| | घटक | लोकसहभागाच्या बाबी |
|---|---|---|
| १ | सुशासनयुक्त पंचायत | • महिला सभा, वॉर्ड सभा, ग्राम सभा यामध्ये सक्रिय सहभाग<br>• केंद्र शासनाचे मेरी पंचायत,पंचायत निर्णय,ग्रामसंवाद इ. विविध ॲप डाऊनलोड करणे |
| २ | सक्षम पंचायत | • ग्रामपंचायतीचे विविध कर वेळेत भरणे<br>• विविध उपक्रमासाठी लोकवर्गणी |
| ३ | जलसमृध्द, स्वच्छ व हरित गाव | • पाण्याचा ताळेबंद करणे<br>• स्त्रोत बळकटीकरणासाठी तलाव, नदी, नाले पुनर्जिवित करणे, वनराई बंधारे तयार करणे<br>• सिमेंट बंधारे व केटीवेअर यांचे गेट बसवणे,<br>• छतावरील पावसाच्या पाण्याचे संकलन<br>• सुक्ष्म सिंचनाखाली क्षेत्र वाढवणे<br>• सौर उर्जेचा वापर<br>• एक व्यक्ती एक झाड रोपण व संवर्धन<br>• संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानात सक्रिय सहभाग घेणे<br>• एकल वापर प्लास्टिक बंदी प्रभावी अंमलबजावणी<br>• सुका कचरा व ओला कचरा विलगीकरण करणे<br>• सांडपाणी व्यवस्थापन |
| ४ | मनरेगा व इतर योजनांचे अभिसरण | • निर्मल शोषखड्डा, जलतारा कामे, शेततळे, ढाळीचे बांध विहिर व बोअरवेल पुनर्भरण<br>• जनावराचा गोठा, कुक्कुट-पालन, शेळी-पालन शेड |
| ५ | संस्था सक्षमीकरण | • शाळा, अंगणवाडी डिजीटल करणे, बोलक्या भिंती रंगवणे यासाठी लोकवर्गणी गोळा करणे किंवा श्रमदानातून करणे.<br>• स्वच्छता गृह व पिण्याच्या पाण्याची सुविधा,<br>• सर्व संस्थामध्ये सोलर यूनिट बसवणे<br>• स्मशानभूमीतील सुविधा तसेच व्यायामशाळा, खुली व्यायामशाळा यासाठी सुविधा उपल्बध करुन देण्यासाठी लोकसहभाग घेणे,<br>• लोकसहभागामधून धार्मिक स्थळांचे सुशोभिकरण |
| ६ | उपजिविका विकास व सामाजिक न्याय | • स्वयंसहायता समूह, बचत गटांमध्ये महिलांचा सहभाग वाढवणे,<br>• शेतकरी उत्पादक संस्थामध्ये महिलांचा सहभाग असणे,<br>• सेंद्रिय शेतीस प्रोत्साहन देणे |

| | |
|---|---|
| ७ नाविन्यपूर्ण उपक्रम | • मागे वळून पाहा - गावाबाहेर राहणाऱ्या प्रतिष्ठीत नागरिकांचा सहभाग<br>• विधवा सन्मान योजना<br>• एकल मुलांचे संगोपन व शिक्षण<br>• घर दोघांचे (पती व पत्नीच्या नावे)<br>• वयोवृध्द जोडप्यांचा सन्मान<br>• माजी सैनिकांचा सत्कार व सन्मान इत्यादी |

## ब) लोकसहभागासाठी कृती कार्यक्रम

- सुस्पष्ट संवाद आणि जनजागृती मोहिम हाती घेणे.
- 'चला जाणूया आपले गाव आणि शिवार', ग्रामीण सहभागीय मूल्यावलोकन (PRA), ग्राम मानचित्र आज्ञावलीच्या मदतीने नियोजन करणे.
- सर्व स्तरावरील लोकप्रतिनिधींचा (पालकमंत्री, मंत्री, खासदार, आमदार, जिल्हा परिषद अध्यक्ष, सभापती, जि.प.व पं.स. सदस्य) सक्रिय सहभाग घेणे.
- गावातील विविध कार्यकारी संस्थांचे अध्यक्ष, दुग्धविकास संस्था, चेअरमन, सेवाभावी संस्था, स्थानिक समुदाय, डॉक्टर, वकिल, अभियंते, शिक्षक/प्राध्यापक, कृषीभूषण, शेतीनिष्ठ शेतकरी, सेवानिवृत्त अधिकारी-कर्मचारी, प्रतिष्ठित नागरिक यांचा सहभाग घेणे.
- राष्ट्रीय सेवा योजना/राष्ट्रीय छात्र सेना (NSS/NCC) तसेच शाळा, हायस्कुल व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा सहभाग घेणे.
- गावातील तरुण मंडळे, युवा मंडळे, महिला मंडळे व महिला स्वयंसहायता गटांचा सहभाग घेणे.
- सत्संग, किर्तनकार, प्रवचनकार, शाहीर, स्थानिक लोककलावंत, भजनी मंडळे, भारुडकार यांचा लोकप्रबोधनामध्ये सहभाग घ्यावा.
- खाजगी-सार्वजनिक-भागीदारी (PPP) द्वारे नाविन्यपूर्ण उपक्रम हाती घेणे.
- ग्रामपंचायतींनी त्यांच्याकडील सर्व प्रकारची माहिती वेळोवेळी सार्वजनिक करावी आणि लोकांचा विश्वास संपादन करावा.
- ग्रामपंचायतीची लोकसहभाग घेण्याची प्रामाणिक भूमिका असावी.

## क) विविध उपक्रम

- जनजागृती व लोकसहभाग –चित्ररथ-रथयात्रा, प्रभातफेरी, शिवार फेरी, मशाल फेरी, रक्तदान शिबीर, सांस्कृतिक कार्यक्रम, पथनाटय आयोजित करणे.
- क्षमता बांधणी व प्रशिक्षण – सचेतन कार्यशाळा, शिबिरे, चर्चासत्र, प्रबोधनपर व्याख्याने आयोजित करणे.
- वृक्षलागवड मोहिम व वृक्ष दिंडी आयोजित करणे.
- नियमित श्रमदान, गाव सफाई, नाला सफाई कार्यक्रम हाती घेणे.
- चावडी वाचन सारखे उपक्रम हाती घेणे.

## ड) लोकसहभाग घेण्याची कार्यपध्दती

- आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर - डिजीटल मीडिया, सोशल मीडीया, प्रिंट मीडीया, गावातील दुरस्थ ग्रामस्थांबरोबर ऑनलाईन प्रणालीद्वारे सुदूर संवाद
- पर्यवेक्षण आणि मूल्यमापन - नियमित आढावा, बैठका, ऑनलाईन संवाद, डॅशबोर्ड, मोबाईल ॲप, वेबसाईट इत्यादी
- पारदर्शकता व उत्तरदायित्व – ग्रामसभा, सामाजिक अंकेक्षण, मासिक सभा, वॉर्ड सभा, महिला सभा, वंचित घटकाची सभा इत्यादीमध्ये नियमित सादरीकरण,
- सर्वसमावेशक आणि जबाबदार प्रशासन – ग्रामस्थांची सनद, शासन आपल्या दारी, प्रशासकीय गतिमानता अभियान, सेवा हक्क अधिनियम प्रभावी अंमलबजावणी
- सुशासनयुक्त पंचायत – तंत्रज्ञान (Technology), कालमर्यादा (Timeline), पारदर्शकता (Transparancy), परिवर्तन (Transformation), सांघिक कार्य (Team work) या पाच 'T' चा अवलंब

## इ) नाविन्यपूर्ण उपक्रम

- मागे वळून पाहा - गावाबाहेर राहणाऱ्या प्रतिष्ठीत नागरिकांचा सहभाग
- विधवा सन्मान योजना अंमलबजावणी करणे.
- एकल मुलांचे संगोपन व शिक्षण करणे
- घर दोघांचे (पती व पत्नीच्या) नावाने करणे
- वयोवृध्द जोडप्यांचा सत्कार व सन्मान करणे व त्यांच्यासाठी विशेष सुविधा उपलब्ध करुन देणे.
- माजी सैनिकांचा सत्कार व सन्मान करणे.
- कृषीभूषण, शेतीनिष्ठ शेतक-यांचा सत्कार व सन्मान करणे.
- विविध सामाजिक पुरस्कार प्राप्त व्यक्तींचा सत्कार व सन्मान करणे.
- शैक्षणिक विशेष प्राविण्यप्राप्त विद्यार्थ्यांचा सत्कार करणे

## ग्रामपंचायतीची भूमिका व जबाबदारी

- लोकांचा पुढाकार – शासनाचे मार्गदर्शन facilitation
- विविध समित्यांवर गावपातळीवर सामाजिक काम करणा-या व्यक्तींचा सहभाग
- डॉक्टर, वकील, शेतकरी, युवक यांचे सहकार्य - Brand Ambassador
- संपादक, पत्रकार, गावातील व्यवसाय व नोकरी निमित्त बाहेर गावी असलेल्या व्यक्तींना कार्यक्रमास बोलविणे
- विविध स्पर्धांचे आयोजन व विजेत्यांना बक्षीसे प्रदान
- नाविन्यपूर्ण उपक्रम

## जिल्हा परिषद व पंचायत समितीची भूमिका व जबाबदारी

- कार्यशाळा आयोजित करणे.
- ग्रामपंचायतींमध्ये स्पर्धात्मक व निरोगी वातावरण निर्मिती करणे.
- जिल्हा व तालुका स्तरीय लोकप्रतिनिधींना सहभागी करुन घेणे.
- ग्रामपंचायतींना नियमित भेटी देणे.
- तांत्रिक व प्रशासकीय मार्गदर्शन करणे.
- विविध उपक्रमात सहभागी होणे.
- श्रमदान, प्रचार फेरीत सहभागी होणे.
- सनियंत्रण करुन विविध उपक्रम व विभागांमध्ये समन्वय साधणे.
- प्रचार व प्रसिध्दी करणे.
- संपर्क अधिका-यांच्या नियमित बैठका व आढावा घेणे.

## माहिती शिक्षण संवाद (IEC) व क्षमता बांधणी

- जनजागृती कार्यक्रम
- प्रशिक्षण कार्यक्रम
- जिल्हा व तालुका स्तरावर कार्यशाळा
- गावात ग्रामसभा/ताळेबंद
- शाळांमध्ये कार्यक्रम
- वृत्तपत्रातून लेख
- चित्रफिती व चित्ररथ
- क्षेत्र भेटी

## प्रचार व प्रसिध्दी

- 'अभियान थीम साँग' तयार करणे.
- स्थानिक पत्रकारांचा सहभाग घेणे व प्रसिध्दी करणे.
- दैनिक, पाक्षिक व मासिकांचे संपादक यांचा विविध कार्यक्रमात सहभाग घेणे.
- जिल्हा व तालुका स्तरावर पत्रकार परिषदा आयोजित करणे.
- सोशल मिडिया, प्रिंट मिडिया, डिजीटल मिडीया यांचा वापर करणे.
- रेडिओ व टिव्हीवर मुलाखत देणे.
- स्थानिक चॅनेलवर प्रसिध्दी देणे.

- पॉडकास्ट, जिंगल्स आणि रिल्स तयार करुन त्याचा वापर करणे
- गावातील सर्व सार्वजनिक ठिकाणच्या भिंती बोलक्या करणे
- गावामध्ये अभियानचे फ्लेक्स व बॅनर दर्शनी भागात लावणे
- आठवडी बाजार, यात्रा, जत्रा, उरुस, महोत्सव, सप्ताह (भागवत, ज्ञानेश्वरी, नवनाथ पारायण इत्यादी), प्रदर्शने, मेळावा इत्यादी ठिकाणी अभियानाचा प्रचार प्रसार करणे
- एसटी स्थानक, रेल्वे स्टेशन, बस स्थानक, वाहन तळ, ग्राम,तालुका,जिल्हा स्तरावरील सर्व शासकीय निम शासकीय कार्यालयाच्या ठिकाणी योजनेची माहिती प्रसारित करणे
- शासकीय व सार्वजनिक वाहनांवर योजनेचे पोस्टर्स लावणे
- गणेशोत्सव, नवरात्र, दुर्गा महोत्सव, दसरा, दिवाळी, महापुरुषांच्या जयंती तसेच पुण्यतिथी, राष्ट्रीय सण इत्यादी दरम्यान अभियानाचा प्रचार व प्रसार करणे.
- ग्रामपंचायत, चावडी, शाळा, अंगणवाडी, रेशन दुकान, सोसायटी इत्यादी सार्वजनिक ठिकाणी योजनेचे फलक, भित्तीपत्रके लावणे.
- शाळा, हायस्कुल, कॉलेज इत्यादी ठिकाणी चर्चासत्र घडवून आणणे
- शाळा, हायस्कुल, कॉलेज इत्यादी ठिकाणी निबंध स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, क्रिडा स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा आयोजित करणे.

## मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान अंतर्गत मोहीम कालावधीतील ग्रामपंचायतीसाठी प्रश्नावली व गुणांकन

| अ.क्र. | अभियान कालावधी पर्यंत करावयाच्या कामाचा तपशील | उद्दिष्ट | साध्य | कार्यवाही स्वरूप | मोहीम कालावधी पर्यंत अपेक्षित उद्दिष्ट | | | गुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | २००० पर्यंत लोकसंख्या | २००० ते ५००० लोकसंख्या | ५००० पेक्षा जास्त लोकसंख्या | |
| | **१) सुशासनयुक्त पंचायत (Good Governance )** | | | | | | | |
| १.१ | **लोकाभिमुख प्रशासन** -ग्रामपंचायत मार्फत दिल्या जाणाऱ्या सर्व सेवा ऑनलाइन पद्धतीने नागरिकांना सुलभ रित्या देणे (लोकसेवा हक्क अध्यादेश - २०१५ अंतर्गत ७ प्रकारचे दाखले तसेच www.dccrs.gov.in द्वारे जन्म व मृत्यू बाबतचे दाखले तसेच अन्य ऑनलाईन सेवा देणे) | प्राप्त अर्ज | निर्गत अर्ज | दि.०१ एप्रिल ते मोहीम कालावधीपर्यंत आलेले अर्ज व निर्गत अर्ज तसेच ऑनलाइन अहवाल तपासून त्या प्रमाणे गुण देणे. | १००% | १००% | १००% | १ |
| १.२ | **नागरी सेवा सुविधा केंद्र दर्जा** - ग्रामपंचायत कडील आपले सरकार सेवा केंद्र सक्षम करून त्यास नागरी सेवा सुविधा केंद्र दर्जा (सीएससी) मिळवणे. त्याद्वारे सर्व शासकीय कार्यालयातील सर्व प्रकारचे दाखले देणे. तसेच लोकोपयोगी B2C सेवा उपलब्ध करून देणे. (प्रामुख्याने सातबारा उतारा, खाते उतारा, प्रॉपर्टी कार्ड उतारा,फेरफार उतारा इत्यादी) | प्राप्त अर्ज | निर्गत अर्ज | ग्रामपंचायत कडील आपले सरकार सेवा केंद्र सक्षम करून नागरी सेवा सुविधा केंद्र दर्जा (सीएससी) मिळवणे. त्याद्वारे ग्रामस्थांना सेवा पुरवठा केली असल्यास त्यानुसार गुण देणे. | १००% | १००% | १००% | १.५ |
| १.३ | **तक्रार निवारण** - ग्रामपंचायत कडील प्राप्त झालेले सर्व सार्वजनिक स्वरूपाच्या तक्रारीचे विहित मुदतीत निवारण करणे. ग्रामपंचायत कार्यालयाच्या दर्शनी ठिकाणी तक्रार पेटीद्वारे देखील तक्रार अर्ज संकलन करण्याची सुविधा ग्रामपंचायत मार्फत केलेली असली पाहिजे. | प्राप्त अर्ज | निर्गत अर्ज | ग्रामपंचायत कार्यालयाच्या दर्शनी ठिकाणी तक्रार पेटीद्वारे देखील तक्रार अर्ज संकलन करण्याची सुविधा ग्रामपंचायत मार्फत केलेली असली पाहिजे. | १००% | १००% | १००% | ०.५ |
| | | | | दि.०१ एप्रिल ते मोहीम कालावधीपर्यंत आलेले अर्ज व निर्गत अर्ज अहवाल तपासून त्या प्रमाणे गुण देणे अन्यथा शून्य गुण देणे. (ज्या गावातील पोलिस स्टेशनला एकही तक्रार गेलेली नाही त्या गावास पूर्ण गुण दयावेत.) | १००% | १००% | १००% | ०.५ |

| अ.क्र. | अभियान कालावधी पर्यंत करावयाच्या कामाचा तपशील | उद्दिष्ट | साध्य | कार्यवाही स्वरूप | मोहीम कालावधी पर्यंत अपेक्षित उद्दिष्ट | | | गुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | २००० पर्यंत लोकसंख्या | २००० ते ५००० लोकसंख्या | ५००० पेक्षा जास्त लोकसंख्या | |
| १.४ | **ग्रामपंचायत वेबसाईट** - ग्रामपंचायत ची वेबसाईट अद्ययावत करुन ग्रामपंचायतीची सर्व माहिती प्रसिध्द करणे (सर्व साधारण माहिती, ग्रामपंचायत वितरीत सर्व सेवा ,सर्व निधी जमाखर्च, हाती घेतलेली कामे,पूर्ण झालेली कामे) व माहिती अधिकार कायद्यान्वये प्रसिद्ध करावयाची माहिती दर्शनी भागावर व ग्रामपंचायत वेबसाईटवर प्रसिद्ध करणे. | वेबसाईटवर माहिती प्रसिध्द करणे | | ग्रामपंचायतची वेबसाईट तयार करणे. | १००% | १००% | १००% | ०.५ |
| | | | | वेबससाईटवर सर्व माहिती प्रसिध्द करणे व अद्यावत करणे. | १००% | १००% | १००% | ०.५ |
| १.५ | **CCTV बसवणे** - ग्रामपंचायत एकूण कार्यक्षेत्रात CCTV /CCTV द्वारे ग्रामपंचायत क्षेत्रात संरक्षण कारणास्तव नियंत्रण ठेवणे व उपाय योजना करणे | ग्रामपंचायतीतील एकूण किती टक्के कार्यक्षेत्रात CCTV स्थापित करुन त्याद्वारे संरक्षणासाठी नियंत्रण ठेवले जाते त्या प्रमाणात गुण देणे. | | | १००% | ९०% | ८०% | १ |
